**दिनांक १७.०२.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ९** :- प्रभाग क्रमांक ११ (फ्रेजरपुरा ) मधील संजय गांधी नगर नं.1 सार्वजनिक शौचालय बाबत.

**ठराव क्रमांक ९** :- उपरोक्त विषयास अनुसरुन प्र.क्र. ११ मधील (फ्रेजरपुरा) मधील संजय गांधी नगर नं. १ मधील सार्वजनिक शौचालय पाडण्याबाबत नागरिकांचे निवेदन प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने मा. सहा. आयुक्त झोन क्र. ३ व ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक यांनी सदर परिसरात पाहणी केली असून सदर शौचालयाच्या आजुबाजुचे परिसरात नागरिकांचे घरी शौचालय असल्याचे आढळुन आले. सद्यस्थितीत शौचालय मध्ये दरवाजे नाही. शिट फुटलेल्या आढळुन आले व आवारांची भिंत सुध्दा तुटलेली आहे. परिसरात संपूर्ण नागरिकांची सदर शौचालय पाडण्याची मागणी आहे. करिता सार्वजनिक शौचालय अतिशय शिकस्त झाल्यामुळे तेथील सार्वजनिक शौचालय पाडण्यासाठी मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक १४/०२/२०२२ रोजी मान्यता प्रदान केलेली असून सदर प्रशासकीय प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेचे मान्यतेस सादर करण्यात आला आहे. सदर्हु प्रशासकीय विषयास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत असून ठराव याच सभेत कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम व पारीत

**स्वा/-**
**सभापती तथा महापौर,**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती.**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.